IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.53
Volume 4, Issue 3, October 2024

# बाल मनाला उमगलेले बाल साहित्य

**श्रीनिथी सागर घोळवे**

**इयत्ता चौथी, सरहद इंग्लिश मिडीयम स्कूल, कात्रज, पुणे, महाराष्ट्र, भारत**

**गोषवारा:** बाल साहित्य म्हणजे काय? बाल साहित्याचे महत्त्व, त्याचे प्रकार या लेखात सांगण्यात आले आहेत. बाल साहित्य आणि मुलांची जडण-घडण यांचे परस्परांशी असलेले नाते येथे उलगडण्यात आले आहे .वेगवेगळे कवी, लेखक,नाटककार यांनी लिहिलेले बालसाहित्य यांचा समावेश येथे करण्यात आला आहे. जे उपलब्ध बालसाहित्य आहे त्याची ओळख करून घेण्याचा प्रयत्न येथे करण्यात आला आहे. कवीने कवितेतून दिलेला संदेश, नाटकातून काढलेली लहान मुलांची समजूत, बोध कथेतून मिळणारा बोध, चातुर्य कथेतून दिसणारे साहस, विनोदी कथेतून मिळणारा आनंद , बालगीतांमधून उलगडणारे रहस्य, आणि जोडीला बडबड गीते या सगळ्यांचे वर्णन येथे करण्यात आले आहे.

**मुख्य शब्द:** बाल साहित्य, विनोदी बालकथा, चातुर्य कथा, कल्पनाशक्ती, बालमन.

**परिचय:** बाल साहित्य अगदी मनाला स्पर्श करून जाते आणि प्रत्येकाला हे माझ्याच बद्दल आहे की काय असे भासू लागते. खूप साऱ्या गोष्टींची माहिती या सगळ्यांमधून मिळते. साने गुरुजी म्हणतात बालकांचे मनोरंजन करणे म्हणजेच, परमेश्वराशी नाते जोडणे होय. एकवेळ मोठ्यांसाठी लिहणे सोपे, परंतु लहानांसाठी लिहिणे, कठीण आहे.

आज कालच्या जगात लहान मुलांना पाठ्यपुस्तके सोडून अजूनही पुस्तके असतात हे सांगण्याची वेळ आली आहे . वेगवेगळ्या गोष्टी कविता, गाणी, नाटक फक्त फक्त इंटरनेटवरच उपलब्ध आहे , असे त्यांना वाटायला लागले आहे.

लहान मुलांमध्ये खूप सारी ऊर्जा असते त्यामुळे ती नेहमी काहीतरी धडपड करत असतात, त्यांची ही ऊर्जा चांगल्या कामी लावणे गरजेचे आहे. मनाच्या शांततेसाठी थोडावेळ तरी वाचन केले पाहिजे . वाचनाची आवड असणे गरजेचे आहे. वाचलेले आत्मसात करता आले पाहिजे.

**बाल साहित्य:** बाल मनाला स्पर्श करणारी आणि त्यांच्या जीवनावर सुसंस्कार करणारे स्फूर्तीदायक रचना म्हणजेच बाल साहित्य. कथा, कविता, पुस्तके, मासिके आणि कादंबरी या सर्वांचा समावेश बालसाहित्यात होतो.मुलांच्या जडणघडणीमध्ये बालसाहित्य महत्त्वाची भूमिका बजावत असते. जे साहित्य बालकांच्या आवडत्या रसांनी भरलेले असते ते साहित्य म्हणजे बाल साहित्य. (संदर्भ पाटील विजया पांडुरंग ).

लहानपणापासूनच घरामध्ये वेगवेगळ्या गोष्टी ऐकल्या अगदी लहानपणी झोपण्यासाठी आई जे गीत गायची ते सुद्धा वेगवेगळ्या शब्दांनी,नात्यांनी एकत्र असे बनवलेले, गोड अंगाई गीत. आजी जी बडबड गीत बोलायची त्यातूनच तर घरातील वस्तूंची नावे माहिती झाली, नाती काय असतात? नात्यांमध्ये कोणकोण असते? या गोष्टी कळाल्या.

मोबाईल आणि इंटरनेटच्या जगात हा विश्वासच बसत नाही की आधी लोक पत्र पाठवून एकमेकांशी संवाद साधायचे. "झुक झुक झुकुझुकु अगीनगाडी, पळती झाडे पाहूया, मामाच्या गावाला जाऊया" हे गीत ऐकून वाटते आज-काल जग किती जवळ आले आणि माणसं किती लांब गेली आहेत. मुलांवर संस्कार होण्यासाठी कोणत्याही शिकवणी ची गरज लागत नाही. ते आपोआप होतात, जर आपण चांगल्या लोकांत वावरत असू. सुरुवात ही घरापासून आणि रोजच्या दैनंदिन जीवना पासून होते.

गोष्टी वाचताना हे लक्षात आले आधीचे लोक शब्द पाळत होते आणि देवाला घाबरत होते. त्यामुळे कुठेतरी सगळे नियंत्रणात होते, असे वाटते.

लहानपणी पासूनच अंगाई गीता मधून बऱ्याचश्या गोष्टी माझ्या कानावर पडल्या. तसेच आजी शेतामध्ये काम करताना काहीतरी शब्द जोडून गाणे गायची तेही मला आठवतात. घरांमध्ये कानावर पडणाऱ्या साई चरित्र,गीता, या पुस्तकातून वेगवेगळ्या गोष्टी कळाल्या. जसे साईबाबा सगळे धर्म समान मानायचे, लोकांना एकत्र कसे आणायचे हे त्यांना माहिती होते. वेगवेगळ्या छोट्या छोट्या साईबाबांच्या गोष्टी वाचण्यात आल्या.

बालसाहित्यांमध्ये खालील गोष्टी आढळल्या आणि त्या म्हणजे-

१.अगदी सोप्प्या शब्दांत मांडणी केलेली आहे.

२. प्रत्येकाला वाटते माझ्याच बद्दल हे लिहलेले आहे.

३ .नातीगोती, परिसर निसर्ग यांचा समावेश आहे.

४. रोजच्या वापरातील गोष्टी नव्याने समोर येतात.

५. एकाजागी बसून वाचण्याची आणि कल्पना करण्याची शक्ती वाढते.

६. चांगले वाईट याचा अर्थ वेगवेगळ्या गोष्टींमधून कळतो.

७. आजचे जीवन किती सुखकारक आणि आयते आहे, हे समजते.

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.53
Volume 4, Issue 3, October 2024

८. समस्या सोडविण्याचे सामर्थ्य मुलांमध्ये येते.

**लेखन साहित्याचा आढावा:**

**प्राण्यांच्या मनोहर गोष्टी:**

- आपल्याकडे जे आहे त्यामध्ये खुश रहावे. जास्त हाव नाही करावी नाहीतर जास्त त्रास सहन करावा लागतो. दु:खी गाढव या कथेचे हे तात्पर्य आहे.
- आपण चांगले कार्य करत असेल तर घाबरू नये, परंतु ते ही सावधपणे करावे हे "वटवाघळाचा सल्ला" या गोष्टीवरून समजते.
- हुशार मांजर या गोष्टीवरून समजते की समोरच्या व्यक्तीला कमी समजू नये आणि स्वतःला खूप हुशार समजू नये.
- कासव आणि मोती या गोष्टीवरून समजते की चांगले मित्र मदतीसाठी नेहमीच धावून येतात, परंतु ऊस गोड लागला म्हणून मुळा सकट खाऊ नये. मित्रांचा गैरफायदा घेऊ नये.

**श्यामची आई (साने गुरुजी) :**

हे पुस्तक वाचल्यावर खालील गोष्टींचा बोध होतो:

- "पाप करताना लाज वाटू दे, चांगले काम करताना लाज नको" असे श्यामची आई नेहमी त्याला म्हणत असे.
- आपल्या पायाला घाण लागू नये म्हणून आपण जसे जपतो तसेच, आपण आपल्या मनाला घाण लागू नये म्हणून जपायला हवे.
- आपले घर स्वर्गापेक्षा छान असते, जेव्हा घरात आई असते.
- प्रत्येक गोष्टीत धर्म आहे, सोडणे म्हणजे धर्म.
- स्त्रियांच्या हृदयात धैर्य, प्रसंगी कठोर होणे हे गुण येतील तेव्हाच त्यांचा पूर्ण विकास होईल.
- आपल्या शक्ती बाहेर काम करू पहाणे तेही वाईट आणि आळशासारखे बसून राहणे, तेही अती वाईट.

**शाम्याची गंमत आणि इतर कथा (माधुरी पुरंदरे):**

- श्यामची गंमत या कथेत मुलगा आणि बाबा यांच्या पात्रांची अदलाबदली करून कथा रंगवली आहे. मुलाला वाटते की मी जर बाबा झालो तर? आणि बाबा माझ्या सारखा लहान झाला तर? एक छान कल्पना येथे रंगविली आहे, जणू एकमेकांची पात्रे, त्यांनी थोड्याच वेळात जगून घेतली आहेत.
- राजकन्या आणि आंब्याचं झाड-प्रत्येक गोष्टीची एक योग्य वेळ असते आणि ती वेळ येईपर्यंत आपण थांबले पाहिजे. जसे की आंब्याच्या झाडाला वर्षभर आंबे येऊ शकत नाहीत. राजकुमारी आणि आंब्याची गोष्ट हीच शिकवण आपल्याला शिकवते.
- घाबरट अम्मी- या कथे मध्ये,पूर्वीच्या शाळा, परिसर. मित्र कसे होते, याचे चित्र येथे रंगवले आहे.आईची मूलांबद्दलची काळजी यातून दिसून येते. आई मुलांना कसा आत्मविश्वास देते हे ही पाहायला मिळते.
- पमीच्या बाबांचा कान फुठला - या गोष्टीत अगदी मजेशीर मुलगी आणि आई-बाबा यांचा संवाद वर्णन केला आहे. पूर्वीच्या काळी घरातील वातावरण कसे असायचे हे इथे पाहायला मिळते.
- सारंग आणि लालू मासा- या कथेमधून तीन गोष्टी शिकायला मिळतात, त्या म्हणजे,1.चांगल्या सवयी, 2.आईचे ऐकले पाहिजे आणि 3. प्राण्यांबद्दलचे प्रेम.

**आत्ता खेळा नाचा (मंगेश पाडगावकर):**

- पुस्तकाच्या पहिल्याच कवितेत सांगितले आहे, पुस्तक नंतर वाचा, आता, खेळा, नाचा. कवीला नक्की काय म्हणायचे आहे हेच कोडे उमगत नाही.
- या पुस्तकात वेगवेगळ्या कविता आहेत. काही प्राण्यांच्या आणि फुलांच्या, तर काही नात्यांच्या. खूप सोप्या शब्दात आणि मजेशीर कविता, अनुभवायला मिळतात. गावाकडील जीवन,जंगल, झाडे, ऊन, पाऊस, वारा या सगळ्या आजूबाजूच्या गोष्टी या कवितेत आलेल्या आहेत. मराठी मधील खूप जुने शब्द वाचायला मिळाले. वस्तू त्याच आहेत परंतु त्याची नावे वेगवेगळी आहेत जसे दप्तर,अडकित्ता इत्यादी.

**तेनालीराम (अमर बाल साहित्य, योगेश जोशी , विनोदी बालकथा)**

तेनालीराम हा विजय नगरचे राजे कृष्णदेव राय यांच्या दरबारातील बुद्धिमान रत्न होय. यामध्ये तेनालीरामची विनोदी वृत्ती, चातुर्य, आत्मविश्वास इत्यादींचे दर्शन होते. मुलांना समजतील अशा सोप्या शब्दात आणि चित्ररूप गोष्टी या पुस्तकात सांगितलेल्या आहेत. हे पुस्तक मनोरंजनाबरोबर मुलांमधील उत्सुकताही वाढवते.

**पंचतंत्र (अमर बाल साहित्य, योगेश जोशी)**:पंचतंत्र मधील वेगवेगळे धडे देतात. व्यवहार ज्ञान शिकवतात. तसेच त्या रोचक आणि प्रेरणादायी असतात.

**चतुर बिरबल छोट्यांसाठी बिरबलाच्या चातुर्य कथा:** या कथांमधून बिरबलाचे वेगवेगळे गुण दिसून येतात. बिरबल हा अकबर बादशहा च्या दरबारातील खूप बुद्धीमान आणि हजर जबाबी व्यक्ती होता. तो वेगवेगळ्या प्रश्नांची उत्तरे शोधून काढत असे आणि प्रजेला न्याय मिळवून देत असे. प्रत्येक गोष्टीचे तो वेगवेगळे दाखले देत असे. त्याच्या भूमिका खूप वेळा विनोदी होत्या.

**आनंदी कावळा ( विनिता पिंपळखरे):** आनंदी कावळा या बालनाट्यामध्ये लहान मुलांचा संवाद रंगविला आहे. त्यांच्या खूप छोट्या छोट्या अपेक्षा येथे सांगितल्या आहेत. यामध्ये शाहीर हे एक पात्र आहे. त्यातील शाहीर यांचे हे काव्य खूप मनाला लागले, ते म्हणजे परिस्थिती जरी कशी असेल त्यात सुखी असेल तोच खरा.

**बालगीते (दि. पां. रेगे) :** कल्पना शक्तीचे दर्शन सर्व बालगीतांमधून होते. जसे आकाशातील म्हातारी ही एक कल्पना खूप छान आहे. वरात निघाली वाऱ्याची हे बालगीत खूप आवडले.चांदोबा ने केली चोरी, हे बालगीत खूप सोप्या शब्दात मांडले आहे. प्राण्यांच्या सभा, आपले कारागीर, आई, आजी या सर्व कविता खूप माहिती देतात.

**झाडे वाढवूया गाणी जाऊया (सुशीला संकपाळ):** या पुस्तकात वेगवेगळ्या देशी झाडांचे महत्त्व वर्णन केले आहे. झाडांची नावेही कळाली आणि त्यांचे उपयोगही. कोणत्या जागी, कोणते झाड येऊ शकते हे त्यातून कळाले. बरेचशी झाडे आत्ता आजूबाजूला दिसतही नाही आणि जि दिसतात, त्याबद्दल या पुस्तकातून खूप माहिती मिळाली.

**मराठी किड्स स्टोरीज** : हे एक मोबाईल ॲप्लिकेशन आहे. यामध्ये वेगवेगळ्या 28 प्रकारांमध्ये वेगवेगळ्या गोष्टी सांगितल्या आहेत. जसे की छान छान गोष्टी, रंजक गोष्टी, लघुकथा, बोधकथा, संस्कार कथा, देवांच्या कथा, संत कथा आणि अजून बरेच काही. प्रत्येक कथा अगदी सोप्या शब्दात सांगितली आहे आणि त्याचे तात्पर्य प्रत्येक कथेच्या शेवटी नमूद केले आहे. हे एक खूप चांगल्या प्रकारचे चालते- बोलते बाल साहित्य आजकालच्या मुलांसाठी आपण वापरू शकतो.

**विश्लेषण:**

मराठी बाल साहित्याचा विस्तार खूप मोठा आहे. या ठिकाणी फक्त मोजक्याच गोष्टी नमूद करण्यात आल्या आहेत. मराठी बाल साहित्याचे प्रकार, उपप्रकार जाणून घेणे खूप महत्त्वाचे आहे. बाल साहित्य हा एकमेव आधार आहे ज्याच्या मदतीने आपण उद्याची भक्कम पिढी तयार करू शकतो. दोन पिढींच्या जीवनशैलीतील बदल बाल साहित्याच्या माध्यमातून मुलांच्या समोर येतो.

**निष्कर्ष:**

सदर लेख बालसाहित्याची माहिती आपल्यासमोर आणतो. याच शिवाय लेखकाने वाचले ले आणि अनुभवलेले बाल साहित्य येथे दिसून येते. जे उपलब्ध बालसाहित्य आहे, ते आजच्या पिढी समोर नव्याने मांडण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. मराठी बाल साहित्य हे आपल्या यशस्वी जीवनाचा भक्कम पाया, निर्माण करणारे साधन आहे. सदर लेखामध्ये वेगवेगळे बाल साहित्य अभ्यासले आहे. बालनाट्य, बालकविता, चातुर्य कथा, विनोदी कथा, कविता, बालगीते आणि बऱ्याचशा छोट्या छोट्या छान छान गोष्टी येथे अभ्यासल्या आहेत. या वरून वेगवेगळ्या गोष्टींचा बोध होतो आणि रोजच्या जीवनात मुले त्याचा उपयोग करू शकतात. या सगळ्या गोष्टींचे तात्पर्य म्हणजे खरेच सुविचार आहे असे वाटते. बाल साहित्याची शिदोरी जर आपल्या सोबतीला असेल तर आयुष्यात आपण प्रत्येक प्रवास मोठ्या ध्येर्याने करू शकतो. कोणत्याही अडचणींवर आपण मात करू शकतो. हसत-खेळत, आनंदी जीवन आत्मविश्वासाने कसे जगावे हे यावरून समजते.

बाल साहित्यामुळे मुलांच्या कल्पनाशक्तीचा विकास होतो. त्यांना नवीन कल्पना सुचतात. वयाच्या 12 व्या वर्षापर्यंत हा विकास वेगानं होत असतो. भविष्यातील येणाऱ्या नवीन समस्या सोडविण्याचे सामर्थ त्यांच्यामध्ये बालसाहित्यामुळेच येईल. आत्मचरित्रांसारखे बाल साहित्य समस्या सोडविण्याची कला जोपासण्यास मदत करते. बाल साहित्य वाचनाने मुले मोकळेपणाने संवाद करायला शिकतात, त्यावर ते चर्चा करतात. आजच्या काळात मोबाईल मुळे मुलांचे सूचनेच कमी झाले आहे. त्यामुळे मुलांना पुस्तकांकडे वळविण्याची गरज आहे. आधुनिक जगाशी संबंधित बालसाहित्य लिहायला हवे आणि ते मुलांना द्यायला पाहिजे हीच आजच्या काळाची गरज आहे.

**संदर्भसुची:**

[1]. बाल साहित्य स्वरूप आणि अपेक्षा,पाटील विजया पांडुरंग, जर्नल फॉर ऑल सब्जेक्ट, आवृत्ती ८, मार्च २०१९.
[2]. तेनालीराम ,अमर बाल साहित्य, योगेश जोशी , विनोदी बालकथा.
[3]. शाम्याची गंमत आणि इतर कथा, माधुरी पुरंदरे,ऑगस्ट १९९८, आवृत्ती सहावी २०१६.
[4]. आत्ता खेळा नाचा, मंगेश पाडगावकर, आवृत्ती सहा, जून २००८, प्रकाशन ३९७.
[5]. आनंदी कावळा, बालनाट्य, विनिता पिंपळखरे, तृतीय आवृत्ती २०१०.
[6]. बालगीते, दि. पां. रेगे, जुलै २००४.
[7]. झाडे वाढवूया गाणी जाऊया, सुशीला संकपाळ.
[8]. पंचतंत्र ,अमर बाल साहित्य, योगेश जोशी.
[9]. चतुर बिरबल, छोट्यांसाठी बिरबलाच्या चातुर्य कथा, श्री भास्कर भाई.